परिपत्रक क्र. 52

रयत शिक्षण संस्था, सातारा
संगणक विभाग
दि.07/03/2024

सर्व शाखाप्रमुख
रयत शिक्षण संस्था

विषय- समाजमाध्यमांचा (You Tube/Facebook) वापर करुन संस्थेच्या प्रसिध्दीसाठी उपयोग करुन घेणेसाठी आपल्या शाखेमध्ये होत असणारे वैशिष्ट्येपूर्ण कार्यक्रमांचे / उपक्रमांचे फोटो त्याची बातमी व 3 ते 5 मिनिटांचा क्षणचित्रित व्हिडिओ संस्थेकडे पाठविणेबाबत.

संस्थेच्या विविध शाखांमध्ये विविध प्रकारचे वैशिष्ट्येपूर्ण कार्यक्रम व उपक्रम होत असतात सदर कार्यक्रम समाज माध्यमांचा वापर करुन सर्व रयत सेवक, कार्यकर्ते, हितचिंतक यांच्या पर्यंत सदर माहिती पोहोचण्यासाठी संस्थेने सदर उपक्रम हाती घेतलेला आहे. तरी आपण आपल्या शाखेमध्ये जे काही वैशिष्ट्येपूर्ण कार्यक्रम व उपक्रम होतात त्याची माहिती खालील पध्दतीने पाठवावी.

सूचना-

1. 5-6 फोटो व त्या कार्यक्रमाची थोडक्यात माहिती Unicode Font (Google Input tools) मध्ये तयार करावी.
2. सदर फोटो व बातमी व व्हिडिओ You Tube/Facebook या समाज माध्यमांद्वारे प्रसिध्द करण्यात येणार असून सदर फोटो उत्कृष्ट व बातमी अचूक असावी.
3. बातमी तयार करताना सदर बातमीला शिर्षक असावे, बातमीमध्ये मान्यवरांच्या नावाचा समावेश असावा. बातमीच्या अनुषंगाने फोटो पाठवावेत.
4. काही महत्वाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे क्षणचित्र असलेला व्हिडीओ अपलोड करावयाचे असल्याने कमीत कमी 3-5 मिनिटांचा व्हिडीओ तयार करुन पाठवावा.
5. आपण दिलेली माहिती संस्थेच्या You Tube/Facebook च्या माध्यमातून प्रसिध्द केली जाणार असल्याने व या माध्यमातून संस्था सादर करणार असल्याने माहिती दर्जेदार असणे अनिवार्य आहे.
6. वरीलप्रमाणे माहिती विहित नमुन्यामध्ये असेल तरच प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे सूचनांचे पालन करुन संस्थेच्या secretary@rayatshikshan.edu या ई-मेलवर कार्यक्रम झालेल्या दिवशी वरीलप्रमाणे माहिती संस्थेकडे पाठवावी. त्यानुसार सदर कार्यक्रमास संस्थेच्या You Tube/Facebook च्या माध्यमातून प्रसिध्दी देण्यात येईल. याबाबत योग्य ती कार्यवाही सर्व शाखाप्रमुखांनी करावी.

सचिव,
रयत शिक्षण संस्था,, सातारा